**म.सं.कौ.हिं.कि.अर्ज.नं. 54/2019 मधील नि.क. 3 वरील आदेश.**
**(CNR No.MHBI09001221-2019)**
**मनिषा कोरडे वि. पांडुरंग कोरडे**

1. अर्जदार हिने प्रस्तूतचा अर्ज घरगुती हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण कायदा 2005 चे कलम 23 अन्वये अंतरिम पोटगी मिळणेकामी दाखल केला आहे.

**अर्जदाराचे संक्षिप्त कथन खालील प्रमाणेः—**

2. अर्जदार क्र.1 चे लग्न गैरअर्जदार क्र.1 सोबत खरात आडगांव ता. माजलगाव येथे झाले असुन लग्नामध्ये अर्जदार क्र. 1 च्या वडीलांनी एकूण 3 लाख रुपये खर्च केलेला आहे. अर्जदार क्र.1 व गैरअर्जदार क्र. 1 यांचे पतीपत्नीचे नातेसंबंध अद्याप कायम आहेत.

3. अर्जदार कथन करते की, ती लग्नानंतर तिचे सासरी गैरअर्जदार क्र.1 याचे घ ारी नांदावयास आल्यानंतर गैरअर्जदारांनी तिला सुरुवातीचे पाच ते सहा महिने चांगले नांदविले. त्यानंतर अर्जदार क्र.1 पासून गरोदर राहिली. त्यावेळी गैरअर्जदार हे अर्जदार क्र.1 हिस जेवायला न देता तिच्याकडून उपाशीपोटी कष्टाचे कामे करून घेत असे व तिस नेहमी अपमानास्पद वागणुक देवून सतत टोचून बोल असते. तसेच अर्जदारास कामाचा कंटाळा आहे असे म्हणून हिनवत असे. गैरअर्जदार क्र.1 हा अर्जदार क्र.1 वर सतत संशय घेवून संशयावरून गुराढोराप्रमाणे रात्री—अपरात्री हातात पडेल त्या वस्तूने मारहान करीत असे. त्यावेळी गैरअर्जदार क्र. 2 व 3 हे सोडवासोडव न करता गैरअर्जदार क्र.1 यास फुस लावून अर्जदार क्र.1 हिस मारहान करण्याची चिथावणी देत असे त्यावरून गैरअर्जदार क्र. 1 हा देखील किरकोळ कारणावरून अर्जदार क्र.1 हिस मारहाण करीत असे. दरम्यानच्या काळात गैरअर्जदार क्र.1 पासून अर्जदार क्र.1 हिस रवि व अर्जदार क्र.2 कपील ही अपत्य जन्मली. त्यानंतर देखील गैअर्जदार क्र.1 हा अर्जदार क्र.1 हिस ''तु मला पसंत नाहीस तु फक्त मला जगाला पत्नी म्हणून दाखवण्यासाठी हवी आहेस, या शिवाय कोणतेही संबंध पत्नी म्हणून तुझयाशी ठेवणार नाही'' असू म्हणून अर्जदार क्र.1 हिस विनाकारण संशयवृत्तीने मारहाण

करत असे.

4. अर्जदार पुढे असे कथन करते की, दि. 15.07.2019 रोजी गैरअर्जदार क्र.1 चे अनैतिक संबंध असलेली महिला नामे कुशीवर्ता गिरगुने व गैरअर्जदार क्र.1 हे अर्जदार दरात काम करित असतांना तेथे आले व अर्जदार क्र.1 हिस विनाकारण शिवीगाळ करून चापटाबुक्क्याने मारहाण करू लागले व अर्जदार क्र.1 हिचे अंगावरील ब्लाउज फाडून गळ्यातील सोन्याची पोत तोडली. त्यानंतर गैरअर्जदार क्र.1 याने अर्जदार क्र.1 हिस म्हणाला की, ''तु जोपर्यंत शेतात विहिर खोदण्यासाठी 1 लाख रू. घेवून येत नाहीस तोपर्यंत तुला नांदवणार नाही'' असे म्हणून घराबाहेर धक्के देवून हाकलून दिले व अर्जदाराचे ताब्यातील मुलगा रवि यास बळजबरीने हिसकावून घेतले. त्यामुळे अर्जदार क्र.1 हि अर्जदार क्र.2 सोबत नाईलाजास्तव तिचे माहेरी आईवडिलाकडे राहत आहे. त्यानंतर दि. 06.07.2019 रोजी अर्जदाराच्या आईवडिलांनी गैरअर्जदारांना समजावून सांगून अर्जदार क्र.1 हिस नांदवण्याची विनंती केली परंतु गैरअर्जदारांनी अर्जदार क्र.1 हिस नांदवण्यास इन्कार केला.

5. अर्जदाराचे पुढे असे कथन करते की, अर्जदार क्र. 1 व 2 हे स्वतःचा उदरनिर्वाह करण्यास असमर्थ असुन त्यांना उत्पन्नाचे कुठलेही साधन नाही. गैरअर्जदारांना शिवार मौजे केसापुरी येथे 01 हे. 00 आर बागायती जमीन आहे. यापासून खर्च वजा जाता वर्षाकाठी 5 लाख रुपयांचे उत्पन्न मिळते. तसेच गैरअर्जदार क्र.1 कडे दोन मोठ्या स्कुलबस असून सदर स्कुलबसपासून महिन्याकाठी खर्च वजा जाता गैरअर्जदार क्र.1 यास 60 हजार रुपयांचे उत्पन्न मिळते. त्यामुळे अर्जदार क्र.1 हिस प्रतिमहा अंतरिम पोटगी म्हणून रक्कम रू. 10,000/– व अर्जदार क्र. 2 यास यांना प्रतिमहा अंतरिम पोटगी म्हणून रक्कम रु.5000/– मिळण्याची विनंती केली आहे.

6. प्रस्तुत प्रकरणात गैरअर्जदारांना नोटीसची बजावणी झाली असता गैरअर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञामार्फत हरज झाले व त्यांनी नि.16 वर प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल करून हरकत नोंदवली. गैरअर्जदारने अर्जदार क्र. 1, 2 व गैरअर्जदार क्र.1 यांच्यातील नातेसंबंध मान्य व कबूल केलेले असून अर्जातील इतर मजकूर नामंजूर केलेला

आहे. गैरअर्जदाराच्या कथनानुसार अर्जदारास गैरअर्जदार क.2 व 3 यांचे पासून विभक्त गैरअर्जदार क.1 बरोबर स्वतंत्र राहण्याची इच्छा होती त्यामुळे ती गैरअर्जदार यांचे कडे नांदत नसे व शुल्लक शुल्लक कारणांवरून भांडण तंटा करीत असे. तसेच, घरातील कामे न करता मोठ्यांना उध्दठपणे बोलून त्यांच्याशी भांडणे करत असे. अर्जदाराचा स्वभाव हा भांडखोर वृत्तीचा असून ती अतिशय उरमट व उध्दठ आहे. गैरअर्जदाराच्या कथनानुसार 2019 चे मे महिन्यामध्ये अर्जदाराच्या विधिज्ञांनी गैरअर्जदार क.1 यास व्यावसायाकरिता 1 लाख रूपयाची मागणी केली असता गैरअर्जदाराची परिस्थितीत नसल्याचे तो सदरची रक्कम देवू शकला नाही. त्यावेळी अर्जदार ही रागाने तिच्या माहेरी निघून गेली व जातांना गैरअर्जदारला खोट्या व बोगस फौजदारी स्वरूपाच्या केसेस दाखल करण्याची धमकी दिली. गैरअर्जदार यांचे कथनानुसार दि. 07.06.2019 रोजी अर्जदार ही गैरअर्जदारचे घरातील रक्कम रू. 60,000/— चोरून घरातील सोन्या चांदीचे दागिणे घेवून पैशासह तिचे वडीलांसोबत माहेरी निघून गेली. अर्जदार हीस गैरअर्जदार क.1 सोबत वैवाहिक जिवनात रस नसल्यामुळे जाणीवपूर्वक व ईच्छापूर्वक ती गैरअर्जदाराबरोबर नांदायचे नाकारत आहे. तसेच त्यांना घाणारड्या भाषेत शिवीगाळ करून अपमान करत असे व धमकी देते की, तुम्ही मला नांदण्याचा अग्रह करू नका नाही तर मी आत्महत्या करेल व तुम्हाला जेल मध्ये पाठवेल.

7. गैरअर्जदारांनी अर्जदारबरोबर नांदण्यासाठी सर्वोत्तोपरी पर्यत्न केले असता अर्जदार ही त्याचे बरोबर नांदत नसल्याने गैरअर्जदार माजलगांव येथील मा. दिवाणी न्यायाधीश व.स्तर यांचे न्यायालयात हिंदू विवाह कायदा 1955 चे कलम 9 अन्वये वैवाहिक संबंध पुर्नस्थापित करण्याकामी हिंदू विवाह कायदा अंतर्गत अर्ज 103/2019 दाखल केला होता. सदरचा अर्ज दि. 29 जुलै 2019 रोजी गैरअर्जदार यांचे हक्कामध्ये मंजुर करण्यात आला. प्रस्तुत अर्जामध्ये मा. दिवाणी न्यायाधीश यांनी अर्जदार नं.1 ही स्वतः स्वईच्छेने कोणत्याही न्याय व योग्य अशा कारणाशिवाय गैरअर्जदार नं. 1 ची संगत सोडून राहत आहे. असे स्पष्टपणे नमूद केलेले आहे. त्यामुळे अर्जदार हीस गैरअर्जदार क.1 कडून पोटगी मागण्याचा अधिकार व हक्क नाही. अशा परिस्थितीत प्रस्तुतचा अर्ज खारीज करणे न्याय व

हिताचे आहे. गैरअर्जदार क्र. 1 ते 3 यांचे हिंदू विभक्त कुटूंब असून गैरअर्जदार क्र. 2 व 3 यांनी स्वतः कमावलेल्या जमीन असून त्याची स्वतंत्र मालकी व ताबा त्यांचेकडे आहे. सदर जमीनीस जायकवाडी धरणाचे पाटाचे पाणी मिळते. अर्जदारास नमूद जमीन मिळकतीबाबत कसलीही मागणी मागण्याचा कोणताही अधिकार अर्जदारास नाही. तसेच गैरअर्जदार यांचे कडे अर्जात नमूद केल्याप्रमाणे कोणतीही स्कूलबस नाही. गैरअर्जदार क्र.1 ची ऐपत नसल्याने तो अर्जदारास पोटगी देवू शकत नाही. परंतु, अर्जदार ही स्वतः टेलरिंगचा व्यावसाय करत असून सदर व्यावसायातून तिला प्रति महिना 15,000/–रू. मिळतात. त्यामुळे अर्जदारास वेगळी पोटगी देण्याची आवश्यकता नाही. सबब प्रस्तुतचा अर्ज खारीज करण्यात यावा.

8. अर्जदारातर्फे विद्वान वकिल श्री.एन.आर.गोले यांचा युक्तीवाद ऐकला. या अर्जाचे निर्णयासाठी खालील मुद्दे निश्चीत केले असून त्यावरील निष्कर्ष कारणमीमांसेसह खालील प्रमाणे नमुद केलेले आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
| --- | --- | --- |
| 1. | अर्जदार मागणी प्रमाणे उदरनिर्वाहासाठी अंतरिम पोटगी मिळणेस पात्र आहे काय ? असल्यास किती ? | ... होय. |
| 2. | आदेश काय ? | ...अंतिम आदेशाप्रमाणे. |

**कारणमिमांसा**

**मुद्दे क्र. 1 व 2 बाबत**

9. अर्जदारांच्या विधीज्ञांनी युक्तीवाद केला की, गैरअर्जदार क्र.1 ते 3 हे अर्जदाराचा शारिरीक व मानसिक छळ करित असे. तसेच, गैरअर्जदार क्र. 1 हा बाहेरखयाली असून त्याचे कुशीवर्ता गिरगुने या महिलेशी अनैतिक संबंध असल्याने गैरअर्जदार क्र.1 हा अर्जदारास व्यवस्थित नांदवत नाही. अर्जदार ही गैरअर्जदारचे मानसिक व शारिरीक छळामुळे अशक्त झालेली असून नेहमी आजारी असते व ती स्वतःचा तसेच अर्जदार क्र.2 चे उदरनिर्वाह तसेच पालन पोषण करण्यास असमर्थ आहे. अर्जदार ही आजरोजी तिचे आई–वडिलांबरोबर राहत असून त्यांची आर्थिक परिस्थिती देखील गरिबीची असल्याने

अर्जदार क्र.1 व 2 यांच्यावर उपासमारीची वेळ आलेली आहे. याउलट, गैरअर्जदारास बागायती शेती असून त्यांना वर्षाकाठी चांगले उत्पन्न मिळते. तसेच, गैरअर्जदार क्र.1 कडे दोन मोठ्या स्कुलबस असून सदर बसपासून महिन्याकाठी सर्व खर्च वजा जाता त्यास 60,000/– रू. उत्पन्न मिळते. त्यामुळे अर्जदार क्र.1 व 2 यांना प्रतिमहिना 15,000/– रू. पोटगी देण्याची त्याची ऐपत आहे.

10. गैरअर्जदार क्र.1 ते 3 व त्यांचे विधिज्ञ आजरोजी गैरहजर. दि. 25.09.2024 रोजी नि.03 कडील आदेशाने गैरअर्जदार यांचा युक्तीवादाचा अधिकार काढून घेतला असल्याने प्रस्तुतचा अर्ज त्यांचे युक्तिवादाशिवाय न्यायनिर्णयीत करण्यात येतो.

11. अर्जातील कथनांचे काळजीपुर्वक अवलोकन केले असता असे दिसून येते की, अर्जदार क्र.1 व 2 तसेच गैरअर्जदार क्र. 1 ते 3 यांच्यातील नातेसंबंध आव्हाणीत करण्यात आलेले नाही. अर्जदारचे कथनानुसार दि. 13.02.2009 रोजी अर्जदार व गैरअर्जदार क्र.1 चा विवाह झाला व त्यानंतर त्यांना अर्जदार क्र.2 व मुलगा नामे रवी अशी दोन आपत्याचा जन्म झाला. अर्जातील कथनानुसार दरम्यानच्या काळामध्ये गैरअर्जदार क्र.1 ते 3 हे अर्जदाराचा शारिरीक व मानसिक छळ करित होते असे नमूद केलेले असून गैरअर्जदार हा अर्जदारास तु मला पसंत नाही असे म्हणून तिला मारहान करित असे. तसेच त्याचे कुशीवर्ता या महिलेशी अनैतिक संबंध असून सदर महिला गैरअर्जदार क्र.1 शी संगणमत करून रात्री अपरात्री अर्जदारास मारहान करित असे व तिस मानसिक व शारिरीक छळ करित असे. तसेच, अर्जातील कथनाप्रमाणे दि. 14.07.2019 व 15.07.2019 रोजी गैरअर्जदार क्र.1 व त्याचे अनैतिक संबंध असलेली महिला कुशीवर्ता यांनी अर्जदारास मारहान केल्याचे ती कथन करते व त्या कारणास्तव तिला नाईलाजास्तव तिचे माहेरी राहण्यास जावे लागले. त्यानंतर दि. 16. 07.2019 रोजी अर्जदारचे आई वडिलांनी गैरअर्जदारास तिला नांदवण्याची विनंती केली असता त्यांनी तिला नांदवण्यास इन्कार केला. तेव्हापासून अर्जदार ही तिचे आई वडिलांकडे राहत असल्याचे ती कथन करत आहे.

12. याउलट, गैरअर्जदार यांनी अर्जातील कथने फेटाळलेले असून अर्जदारास गैरअर्जदाराकडे नांदण्याची ईच्छा नसल्याचे ति स्वखुशीने तिचे माहेरी राहत असल्याचे कथन करत आहे. तसेच, गैरअर्जदारने माजलगांव येथील दिवाणी न्यायालय व.स्तर येथे हिंदू विवाह कायदाअंतर्गत वैवाहिक संबंध पुर्नस्थापित करण्याचा अर्ज न्यायालयात दाखल केला होत व सदरचा अर्ज गैरअर्जदार यांचे लाभात मान्य झाला असतांना देखील अर्जदार गैरअर्जदारकडे नांदावयास येत नसल्याचे कथन गैरअर्जदार करित आहे. गैरअर्जदारने मा. दिवाणी न्यायालय व.स्तर यांचे न्यायालयातील एच.एम.पी क्र. 103/2019 या प्रकरणातील न्यायनिर्णयाची नक्कल प्रत दाखल केलेली असून सदरचे प्रकरण हे गैरअर्जदारचे लाभात दि. 29.06.2021 रोजी मान्य झाले असल्याचे दिसून येते व त्याअन्वये अर्जदारास गैरअर्जदाराकडे नांदण्यास आदेशीत करण्यात आले होते. परंतु, सदरचे प्रकरणामध्ये अर्जदारने तिचे म्हणणे दाखल केल्याचे दिसून येत नाही. तसेच, तिचे विधिज्ञांनी गैरअर्जदाराचा पुरावा सदर प्रकरणात आव्हाणित केलेला नाही. त्यामुळे सदरचे प्रकरण अर्जदारचे म्हणणे व पुराव्याशिवाय न्यायनिर्णीत झाल्याचे दिसून येते. तथापि, नांदण्याचा आदेश झालेला असतांना देखील अर्जदार नांदावयास येत नसल्यास त्याबाबत दि.प्र.सं यामधिल तरतुदींचा अवलंब गैरअर्जदारास करता येवू शकतो. परंतु, केवळ उपरोक्त न्यायनिर्णयाच्या आधारावर प्रस्तुत प्रकरणातील संपरिक्षेशिवाय अर्जदारास तिचे न्याय हक्कापासून आजरोजी वंचित ठेवणे न्याय व योग्य नाही. ***मा. उच्च न्यायालय मध्यप्रदेश यांनी दिपक निलळंठ वि. प्रियंका निलकंठ व इतर 2024 एस.सी.सी ऑनलाईन एम.पी 8255*** या न्यायनिर्णयामध्ये असे अधोरेखित केले आहे की, केवळ वैवाहिक संबंध पुर्नस्थापित होण्याच्या हुकुमनाम्यामुळे अर्जदारास पोटगीचे अधिकारापासून वंचित ठेवता येणार नाही. त्यामुळे सदर मा. उच्च न्यायालयाचा न्यायनिर्णय हा प्रस्तुत प्रकरणामध्ये तंतोतंत लागू होतो.

13. अर्जातील कथनांचे काळजीपूर्वक अवलोकन केले असता प्रथमदर्शी असे दिसून येते की, अर्जदार ही कौटुंबिक हिंसाचाराने पिडीत असून आजरोजी तिचा मुलगा नामे कपिल अर्जदार क्र.2 याचे बरोबर माहेरी आईवडिलांकडे राहते परंतू तिच्या आईवडीलांची आर्थीक परिस्थीती जेमतेम असल्यामुळे अर्जदाराच्या दैनंदिन गरजांचा, मुलाच्या शिक्षणाचा व

औषधोचाराचा विचार करता अर्जदार ही अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहे. अर्जदाराने तिच्या अर्जामध्ये गैरअर्जदारास असलेल्या उत्पन्नाच्या साधनांचा जसे की, शेती तसेच स्कुलबस असल्याबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. त्यामुळे केवळ अर्जदाराचे अर्जातील कथनांवर विसंबून राहुन गैरअर्जदारास वर्षाकाठी सदरचे उत्पन्न मिळते असा तर्क काढणे न्यायोचित होणार नाही. अर्जदाराच्या उदरनिर्वाहाची तरतुद करणे हे गैरअर्जदारची पती या नात्याने कर्तव्य व जबाबदारी आहे. अर्जदाराचे अर्जातील कथन व गैरअर्जदाराची आर्थिक स्थिती पाहता अर्जदाराचे उपजीविकेसाठी व दैनंदिन खर्चाकरीता अर्जदार क्र.1 हिस दरमहा अंतरिम पोटगी म्हणून रक्कम रु.2500/—आणि अर्जदार क्र.2 यास दरमहा अंतरिम पोटगी म्हणून रक्कम रु.500/— देणे न्यायोचित ठरते असे माझे मत आहे. सबब मुददा क्र. 1 बाबतचा माझा अभिप्राय होकारार्थी देवून मुददा क्र. 2 च्या उत्तरार्थ खालील आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

| | |
|---|---|
| 1) | अर्जदाराचा अर्ज नि.क्र.3 अंशतः मंजूर करण्यात येत आहे. |
| 2) | गैरअर्जदार क्र.1 याने अर्जदार यांच्या उदर निर्वाहासाठी व जीवनावश्वक गरजेसाठी अंतरिम पोटगी म्हणून अर्जदार क्र. 1 हीस दरमहा रक्कम रूपये 2,500/—व अर्जदार क्र. 2 यास दरमहा रु. 500/— सदरचा अर्ज दाखल झालेल्या तारखेपासून द्यावेत. |
| 3) | न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला. |

Digitally signed by RAHUL BALBHIM POL
Date: 2025.02.07 13:43:10 +0530

माजलगाव. ( आर.बी.पोळ )
दिनांक : 05/02/2025. न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग माजलगाव.